महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com    दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/426    दिनांक : 14 एप्रिल, 2021

---

**वाचा** :- 1. साथरोग कायदा, 1897

2.आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51

3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973

4. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 15/03/2021

5. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/314 दि. 16.03.2021

6. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 27/03/2021

7. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/373 दि. 27.03.2021.

8. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 04/04/2021.

9. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/394 दि. 05.04.2021.

10. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 05/04/2021.

11. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/395 दि. 06.04.2021.

12. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 09/04/2021.

13. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/423 दि. 09.04.2021.

14. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 13/04/2021.

---

## : : आदेश : :

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2, 3, व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्याबाबतची नियमावली प्रसिध्द करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, कोरोना (कोविड-19) विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेव्दारे संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात **"ब्रेक दि चेन"(BREAK THE CHAIN)** अंतर्गत संदर्भ क्र. 06, 08, 10 व 12 चे आदेशान्वये कोरोना विषाणूच्या वाढत्या पार्श्वभुमीवर संपुर्ण महाराष्ट्रात काही ठरावीक बाबींस दि. 30.04.2021 पावेतो प्रतिबंध करण्यासंबंधाने वेळोवेळी आदेश निर्गमीत केलेले असल्याने, राज्य शासनाकडील उक्त आदेश व त्यानुषंगाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशातील संपुर्ण तरतूदी चंद्रपूर जिल्हयातील कार्यक्षेत्रात संदर्भ क्र. 07, 09, 11 व 13 चे आदेशान्वये दिनांक 30 एप्रिल, 2021 पावेतो यथास्थिती लागु करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 14 चे सुधारीत आदेशान्वये, संपूर्ण राज्यात कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावात अधिक वाढ होत असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे संबंधाने संपुर्णत: बाबींस (अत्यावश्यक वगळता) कडक निर्बंध लावण्यात आलेले आहे व सदर निर्बधाचे काटेकोरपणे पालन करण्यास सुचीत केलेले आहे.

त्याअर्थी, **मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर असे आदेशीत करतो की,**

1. **फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम 144 व नाईट कफर्यु :-**

अ) संपूर्ण चंद्रपूर जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 च्या तरतुदी लागु राहतील.

ब) कोणत्याही नागरीकांस/व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी वैध कारणांशिवाय एकत्र फिरण्यास किंवा एकत्र जमा होण्यास प्रतिबंध असेल.

क) सर्व आस्थापना/दुकाने, सार्वजनिक ठिकाणे, उपक्रम, सेवा (अत्यावश्यक वगळता) पुर्णत: बंद राहतील.

ड) अत्यावश्यक सेवेतील उपक्रम व सेवा, त्यांची वाहतूक व हालचाली किंवा संचार हया प्रतिबंधीत असणार नाहीत.

इ) अत्यावश्यक सेवेतील उपक्रम व सेवा, त्यांची वाहतूक व हालचाली किंवा संचार सकाळी 07.00 ते रात्री 08.00 पर्यंत चालु राहतील.

फ) स्थानिक वाहन चालक/ घरकाम सहाय्यक/ मदतनीस यांना कामावर जाणे-येणे याकरिता संबंधीत घरकाम सहाय्यक/ वाहन चालक / मदतनीस यांनी महानगरपालीका क्षेत्रांसाठी आयुक्त, महानगर पालीका, नगर परिषद/ नगर पंचायत क्षेत्रासाठी मुख्याधिकारी, आणि ग्रामीण क्षेत्रासाठी तहसिलदार यांचेकडे अर्ज करावा. संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांनी अर्जाची शहानिशा करुन घरकाम **सहाय्यक/ वाहन चालक/ मदतनीस यांना ओळखपत्र वितरीत करावेत.**

2) **खालील सेवेचा समावेश अत्यावश्यक सेवेत राहील :-**

1) हॉस्पीटल्स, डायग्नोस्टीक सेंटर, क्लिनीक्स, लसीकरण, मेडिकल इन्शुरन्स ऑफीसेस, औषधी दुकाने व औषधांची निर्मीती करणा-या आस्थापना तसेच इतर वैद्यकीय व आरोग्य सेवांच्या डिलर्सची वाहतूक आणि पुरवठा साखळीसह उत्पादन व वितरणास सहाय्य असलेल्या सर्व सेवा. लसींची वाहतुक व पुरवठा साखळी, सॅनिटायजर्स, मास्क, वैद्यकीय उपकरणे, कच्चा माल युनिट व सहाय्य सेवा.

2) पशुवैद्यकीय सेवा/पशु देखभाल आश्रयस्थान आणि पाळीव प्राण्यांची खाद्ये दुकाने.
3) किराणा दुकान, भाजी दुकाने, फळांची दुकाने, डेअरी, बेकरी, मिठाई दुकाने, सर्व प्रकारची धान्य दुकाने.
4) कोल्ड स्टोअरेज आणि गोदाम सेवा
5) सार्वजनिक वाहतुक – विमान, रेल्वे, टॅक्सी, ऑटो, सार्वजनिक बसेस.
6) विविध देशांच्या परराष्ट्र संबंध विषयक कार्यालयांच्या कार्याशी संबंधीत सेवा.
7) स्थानिक प्राधिकरणांकडील मान्सूनपूर्व उपक्रम.
8) स्थानिक प्राधिकरणांकडील सर्व सार्वजनिक सेवा.
9) भारतीय रिजर्व बँक व त्यांचेशी संलग्नीत अधिकृत अत्यावश्यक सेवा.
10) भारतीय प्रतिभुती व विनिमय बोर्ड (SEBI) कार्यालय व सेबीने अधिकृत केलेली कार्यालय जसे की, स्टॉक एक्सचेंज, डिपॉजीटरी व क्लिअरींग कार्पोरेशन (Depositories & Clearinig Corporations), सेबी अधिकृत मध्यस्थी संस्था (Internmediaries registered with SEBI).
11) टेलीकॉम सेवांच्या दुरुस्ती/देखभालींच्या सेवा.
12) माल वाहतूक.
13) पाणी पुरवठा सेवा.
14) शेतीविषयक उपक्रम आणि शेती संबंधीत उपकरणे, बियाणे, खताची उपकरणे व त्यांची दुरुस्ती यांसह कृषी क्षेत्राचे अखंड निरंतरता सुनिश्चीत करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व कामे.
15) सर्व वस्तुंची निर्यात-आयात.
16) ई-कॉमर्स सेवा (फक्त अत्यावश्यक वस्तु व सेवांचा पुरवठा)
17) मान्यताप्राप्त वृत्तपत्र व त्यांचेशी संबंधीत माध्यमे व इतर सेवा.
18) पेट्रोल पंप व पेट्रोलीयम संबंधीत उत्पादने.
19) सर्व मालवाहक सेवा.
20) डाटा सेंटर/क्लाऊड सर्व्हीस पुरवठादार/माहिती तंत्रज्ञान सेवांना पुरक/सहाय्यक पायाभुत सेवा.
21) शासकीय व खाजगी सुरक्षा विषयक सेवा. (Security services).
22) विद्युत वितरण व गॅस सिलेंडर संबंधीत सेवा.
23) ए.टी.एम. (ATM's).
24) पोष्टल सर्व्हीसेस.
25) बंदरे व संबंधीत उपक्रमे.
26) कस्टम हाऊस अभिकर्ता/लसी/जिवनाश्यक औषधे/औषध उत्पादने वाहतुकी संबंधीत परवानाधारक वाहतुकदार.
27) आवश्यक सेवांसाठी कच्चा माल/ पॅकेजिंग मटेरियल्स उत्पादन करणारी युनिट.
28) पावसाळयाच्या हंगामासाठी साहित्याचे उत्पादन करणारी युनिट
29) आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून प्राधिकृत केलेल्या कोणत्याही सेवा.

❖ **<u>अंमलबजावणी करणा-या वरील आस्थापनांनी खालील सामान्य तत्वे पाळणे आवश्यक राहील.</u>**

- सर्व अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी हे सर्व निर्बंध नागरिकांच्या वावरावर / हालचालीवर असून वस्तू आणि मालावर नाहीत हे लक्षात घ्यावे.

- यात नमूद केलेल्या सेवांच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक वाहतूक हे वैध कारण राहील हे लक्षात घ्यावे.
- या सेवांची विशिष्ट वेळी वा कारणाने गरज भासली तर संबंधित व्यक्ती वा संस्थेसाठी ती सेवा जीवनावश्यक गणली जावी .

**3) <u>या आदेशात वरीलप्रमाणे नमुद केल्यानुसार आवश्यक सेवांच्या अंतर्गत येणारी दुकाने/आस्थापना/उपक्रम हे खालील मार्गदर्शक सुचनांचे अनुसरण करतील.</u>**

अ) अत्यावश्यक सेवेतील आस्थापना/दुकानदार/उपक्रम व तेथील कार्यरत कामगार/कर्मचा-यांनी सदर परीसरात कोव्हीड-19 वर्तनाबाबत असलेल्या नियमांचे कोटेकोरपणे पालन करावेत.

ब) भारत सरकारच्या निकषानुसार अत्यावश्यक सेवा पुरविणा-या दुकान संचालकांनी व त्यामधील कार्यरत कर्मचारी/कामगारांनी लवकरात लवकर आपले लसीकरण करुन घ्यावे. तसेच सर्व दुकान संचालकांनी ग्राहकांशी सुसंवाद साधतांना पारदर्शक काच किंवा इतर सामग्रीव्दारे बनविलेले शिल्डचा वापर व ई-पेमेंट पध्दतीचा वापर करावा.

क) स्थानिक अत्यावश्यक सेवेतील दुकानदार, तेथील कार्यरत कर्मचारी/कामगार किंवा ग्राहक यांनी वरील नियमांचे भंग केल्यास रु. 500/- दंड आकारण्यात येईल तसेच जर दुकान/आस्थापना/उपक्रम यांचेकडून ग्राहकांस सेवा देतांना कोव्हीड-19 वर्तनाबाबत असलेल्या नियमांचे भंग करतांना आढळल्यास त्यांना प्रथमत: रु. 1000/- दंड आकारण्यात येईल. व दुस-यांदा आढळल्यास सदर दुकान/आस्थापना/उपक्रम कोव्हीड-19 साथीचा प्रादुर्भाव संपेपर्यंत बंद करण्यात येईल.

ड) अत्यावश्यक सेवेतील कार्यरत व्यक्तींची वैध कारणांच्या हालचालीस परवानगी राहील.

इ) जिवनावश्यक सेवेत येणारे भाजीपाला दुकाने व फळविक्रेते या सर्वांच्या बाबतीत एकाच ठिकाणी गर्दी होणार नाही याचे नियोजन स्थानिक प्रशासनाने करावे जेणेकरून कोरोणा या विषाणूचा प्रसार होणार नाही याची दक्षता घ्यावी.

फ) सध्या बंद असलेल्या सर्व दुकानांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी स्वत: व त्यांच्या सर्व कामगारांचे लसीकरण करून घ्यावे.

4) **<u>सार्वजनिक वाहतुक :-</u>**

- खालील प्रतिबंधांसह सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पुर्णपणे कार्यान्वीत राहील.

| | |
|---|---|
| ऑटो रिक्शा | चालक + 2 प्रवासी फक्त |
| टॅक्सी (4 चार चाकी) | चालक + परिवहन विभागाव्दारे निर्धारीत करण्यात आलेल्या वाहनातील बैठक क्षमतेच्या 50 टक्के |
| बस | परिवहन विभागाव्दारे निर्धारीत करण्यात आलेल्या वाहनातील बैठक क्षमतेच्या पुर्ण क्षमतेसह सुरु राहतील. परंतु उभे राहुन प्रवास करण्यास अनुमती नसेल. |

अ) सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणा-या सर्व प्रवाशांनी मास्कचा वापर योग्य प्रकारे करणे अनिवार्य राहील. तथापी संबंधीतांकडून याचे उल्लंघन झाल्यास रु. 500/- दंड आकारण्यात येईल.

ब) चार चाकी वाहनांच्या बाबतीत वाहनात बसलेल्या प्रवाश्यांपैकी कुणाही एका प्रवाश्याने मास्क चा योग्य प्रकारे वापर न केल्यास, वाहन चालक व संबंधीत प्रवासी यांना प्रत्येकी रु. 500/- दंड आकारण्यात येईल.

क) प्रत्येक फेरी नंतर वाहनांचे निर्जंतुकीकरण (Sanitize) करणे आवश्यक राहील.

ड) सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेतील चालक व कार्यरत कर्मचारी जे नागरीकांच्या संपर्कात येत असतील अशा कर्मचा-यांनी भारत सरकारच्या निकषानूसार लवकरात लवकर आपले लसीकरण करुन घ्यावे व कोव्हीड-19 वर्तनाबाबत असलेल्या नियमांचे काटेकोरणे पालन करावे. टॅक्सी व ऑटो चालकांनी प्रवासी व स्वत: मध्ये प्लॅस्टीक शिटचा वापर करुन स्वत:ला वेगळे ठेवण्यास प्रोत्साहीत करण्यात येत आहे.

इ) सार्वजनिक वाहतुकीशी संबंधीत कर्तव्ये पार पाडणा-या व्यक्तींच्या वाहतुकीस अत्यावश्यक सेवांबाबतचे कारण मानले जाईल.

फ) रेल्वेबाबत, रेल्वे प्रशासनाकडून प्रवासादरम्यान कोणताही प्रवासी रेल्वेच्या सामान्य डब्यामधुन उभा राहुन प्रवास करणार नाहीत, आणि सर्व प्रवासी मास्क वापरतील याची खात्री करावी.

ग) रेल्वे प्रवासा दरम्यान कोव्हीड-19 वर्तनाबाबत असलेल्या नियमांचे पालन न करणाऱ्या प्रवाश्यांना रु. 500/- इतका दंड आकारण्यात येईल.

ह) अत्यावश्यक सेवा सुरळीत राहण्याकरीता सार्वजनिक वाहतुक काही अटींवर सुरु राहील.

घ) रेल्वे/बस/विमानाव्दारे प्रवास करुन रहीवाशी ठिकाणी येणा-या किंवा जाणा-या व्यक्तींना वैध तिकीटांचा आधारे सार्वजनिक वाहतुकीच्या प्रवासी साधानांव्दारे प्रवासास मुभा राहतील.

5) **सुटप्राप्त श्रेणी :-**

अ) **कार्यालय :-**

- **खालील कार्यालय सुरु राहतील.**
  - ➢ केंद्र शासनाचे कार्यालय, राज्य व स्थानिक प्रशासनाचे कार्यालय व त्यांचे प्राधिकरण व संस्था.
  - ➢ सहकारी संस्था / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम व खाजगी बँका.
  - ➢ अत्यावश्यक सेवा प्रदान करणा-या कंपन्यांची कार्यालये.
  - ➢ इन्शुरन्स/मेडिक्लेम संबंधीत कंपनी.
  - ➢ औषध निर्मीती कंपन्यांची उत्पादन/वितरण यांच्या व्यवस्थापनाशी संबंधीत कार्यालये.
  - ➢ भारतीय रिजर्व बँक व अधिकृत मध्यस्थी संस्था यामध्ये स्टॅण्डअलोन प्रायमरी डिलर्स (Standalone primary dealers), सी.सी.आय.एल (CCIL), एन.पी.सी.आय.(NPCI), पेंमेंट व्यवस्थेशी संबंधीत ऑपरेटर (payment system operator), भारतीय रिजर्व बँक अधिकृत वित्तीय बाजारात सहभाग घेणारे ऑपरेटर्स ( Financial market participants operating in RBI regulated markets) यांचा समावेश असेल.
  - ➢ बिगर बँकींग वित्तीय आस्थापना.
  - ➢ सर्व सुक्ष्म वित्तीय संस्था
  - ➢ जर न्यायालये, न्यायाधिकरण किंवा चौकशी आयोगांचे कार्य चालु असतील तर वकीलांची कार्यालये.
  - ➢ कोव्हीड-19 संबंधीत कार्य करणारी शासकीय कार्यालया व्यतिरीक्त उपरोक्त कार्यालये कमीत-कमी कर्मचारी आणि 50 टक्के कर्मचारी यांच्या उपस्थितीत सुरु राहतील.
  - ➢ उपरोक्त कार्यालयातील कार्यरत कर्मचारी/कामगार यांची वाहतूकीस परवानगी राहील.
  - ➢ स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आवश्यकता असतील असे कार्यालय सुरु ठेऊ शकतील.
  - ➢ शासकीय कार्यालयामध्ये अभ्यांगतांना प्रवेश नसेल आणि त्यांचेकडील बैठक/सभा (कार्यालयीन परिसरातील कर्मचारी वगळता) ऑनलाईन पध्दतीने घ्याव्यात.

- शासकीय व खाजगी कार्यालयातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी/कामगारांनी भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर आपले लसीकरण करुन घ्यावे. जेणेकरुन कोव्हीड-19 चा प्रसार होण्याची भिती न बाळगता राज्य शासनाकडून सदर कार्यालये सुरु करण्याबाबत त्वरीत निर्णय घेता येईल.

ब) <u>खाजगी वाहतुक :-</u>

- सर्वसाधारणपणे खाजगी वाहने (खाजगी बसेससह) यांची वाहतूक आपात्कालीन व अत्यावश्यक सेवां तसेच या आदेशातील वैध कारणांकरीता सुरु ठेवण्यास परवानगी राहील.
- उपरोक्त नियमांचे भंग करणा-यास रु. 1000/- दंड आकारण्यात येईल.
- याव्यतिरिक्त खाजगी बसेसकरीता खालील नियम लागु राहतील :-

  अ) परवानगीप्राप्त आसन क्षमतेसह वाहतूकीस परवानगी असेल परंतु प्रवासी यांना उभे राहुन प्रवास करण्यास मनाई असेल.

  ब) खाजगी वाहतूक व्यवस्थेतील कार्यरत कर्मचारी यांनी भारत सरकारच्या निकषानूसार लवकरात लवकर आपले लसीकरण करुन घ्यावे. व कोव्हीड-19 वर्तनाबाबत असलेल्या नियमांचे पालन करावे.

क) <u>रेस्टारंट, हॉटेल, उपहारगृहे :-</u>

अ) हॉटेलच्या अंतर्गत भागात असलेल्या उपहारगृहा व्यतिरिक्त सर्व उपहारगृहे बंद राहतील.

ब) केवळ घरपोच सेवा सुरु राहतील आणि सदर रेस्टॉरंटमध्ये ऑर्डर देण्यासाठी जाण्यास प्रतिबंध राहतील.

क) हॉटेलच्या आत असलेले उपहारगृह हे केवळ हॉटेल मध्ये राहत असलेल्या अतिथींसाठी सुरु ठेवता येतील. कोणत्याही परिस्थीतीत बाहेरच्या अतिथींना परवानगी राहणार नाही. बाहेरील प्रवाशांसाठी वर नमूद केलेले रेस्टारंट प्रतिबंधाचे पालन केले जाईल. रेस्टारंट मधील अतिथी केवळ वैध कारणास्तव किंवा अत्यावश्यक सेवांच्या कर्तव्यासाठी किंवा या आदेशातील नमूद वैध कारणांसाठी बाहेर जाऊ शकतील.

ड) घरपोच सेवांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींचे भारत सरकारच्या निकषानूसार लवकरात लवकर लसीकरण करण्यात यावे.

इ) एकापेक्षा अधिक कुटुंबे असलेल्या सदनिकेत वितरण करायचे असेल तर ते सदनिकेच्या प्रवेशद्वारापर्यंतच सीमित असणे अपेक्षित आहे आणि त्या वस्तूंची सदनिकेच्या आतील वाहतूक ही सदनिकेच्या संबंधित कर्मचा-याने करावी. वितरण कर्मचारी आणि सदनिकेतील व्यक्ती यांच्यात होणारी सर्व देवाणघेवाण ही नियम पाळून आणि कोविड च्या अनुषंगाने **शिस्तबद्ध पद्धतीने होणे अपेक्षित आहे.**

**फ) यानुसार वरील प्रमाणे नियमाचा भंग केल्याबद्दल संबंधीतांवर रक्कम रुपये 1000/- दंड आणि** संबंधितआस्थापनेकडून रक्कम रूपये 10,000/- दंड आकारला जाईल. वारंवार अशा स्वरुपाचा गुन्हा केल्यास साथरोग अधिसूचना लागू असेपर्यंत परवाना रद्द करणेत येईल.

ग) हॉटेल, उपहारगृहे, रेस्टारंट मध्ये कार्यरत सर्व कर्मचारी यांचे भारत सरकारच्या निकषानूसार लवकरात लवकर लसीकरण करण्याबाबत सल्ला देण्यात येत आहे जेणेकरुन सदर आस्थापना सुरु करता येतील.

ड) **उत्पादन क्षेत्र :-**

अ) खालील आस्थापना आवश्यकतेनुसार वेगवेगळया शिफटमध्ये कार्यरत राहतील.

- जी उत्पादने अत्यावश्यक सेवांकरीता वापरात येतात त्या आस्थापना पुर्ण क्षमतेने कार्यरत राहतील.
- निर्याती संबंधीचे नियमानुसार फक्त निर्यातीकरीता उत्पादन करणा-या आस्थापना सुरु राहतील.
- ज्या औद्योगिक आस्थापनांमधील यंत्रणा तात्काळ खंडीत करता येत नाहीत वा कार्यान्वीत करण्यास बराच कालावधी लागतो अश्या आस्थापना 50 टक्के मनुष्यबळाच्या वापरासह सुरु ठेवता येतील. या प्रावधानाची कोणत्याही आस्थापना व्दारे गैरवापर होणार नाही व सदर आस्थापनांमध्ये कोव्हीड-19 वर्तनाबाबत असलेल्या नियमांचे पालन होत असल्याबाबत महाराष्ट्र शासनाकडील उद्योग विभागांनी खात्री करावी. सदर प्रावधान ऑक्सीजन उपभोक्त्यांना लागु राहणार नाही.

ब) ज्या आस्थापनांनी मजुरांची राहण्याची व्यवस्था कंपनी परीसरात केलेली आहे वा कंपनीच्या आवाराबाहेर केली आहे (रहीवासी क्षेत्रातील रहिवाश्यांच्या संपर्कात न येता कंपनीत प्रवेश करु शकत असतील) अशा आस्थापनांना कामकाज सुरु ठेवण्यास परवानगी आहे. परंतु कार्यालयीन कामकाजाशी संबंधीत एकुण अधिकारी/कर्मचारी संख्येच्या 10 टक्के कर्मचारी (बाहेरुन येणा-या) यांच्या उपस्थितीस परवानगी असेल. कंपनीच्या आवाराबाहेर राहणा-या कर्मचारी/कामगारांना सदर आदेश लागु असेपर्यंत कपंनीच्या आवारात प्रवेश करण्यास मनाई असेल. जर आवश्यकता असेल तर सदर आस्थापना वेगवेगळया शिफटमध्ये सुरु राहु शकतील.

क) उद्योग व्यवस्थापन, प्रशासन व सर्व कर्मचारी / मजूर यांनी भारत सरकारच्या निकषानुसार शक्य तेवढ्या लवकर लसीकरण करून घ्यावे.

ड) **कारखाने आणि उत्पादन करणारे युनिट यांना खालील प्रमाणे नियमांचे पालन करावे लागेल :-**

- कारखाने व उत्पादकआस्थापना यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना तापमान तपासूनच प्रवेश द्यावा.
- जर एखादा कर्मचारी / मजूर कोविड पॉझिटीव्ह आढळला तर, त्याच्या सोबत निकट संपर्कात आलेल्या इतरकर्मचारी / मजूर यांना पगारी रजा देवून त्यांचे अलगिकरण करण्यात यावे.
- ज्या कारखान्यात / आस्थापनेत 500 पेक्षा जास्त कर्मचारी काम करत असतील अशा कारखान्यांनी/आस्थापनांनी त्यांचे स्वत:चे अलगिकरण केंद्र स्थापन करावेत. सदर अलगीकरण केंद्रात सर्व मुलभूत सेवा असतील याची काळजी घ्यावी. व सदर सेवा ही कारखाना बाहेर असेल तर सर्व सुरक्षा उपाय करून पॉझिटिव्ह व्यक्तीला केंद्रापर्यंत घेऊन जावे लागेल.
- जर एखादा कर्मचारी कोविड पॉझिटीव्ह आढळल्यास, सदर आस्थापनेचे संपूर्ण निर्जंतुकीकरण पूर्ण होत नाही तो पर्यंत सदरआस्थापना बंद ठेवण्यात यावी.
- जेवण व चहाच्या वेळा वेगवेगळ्या ठेवण्यात याव्यात जेणे करुन गर्दी होणार नाही, तसेच एकत्र बसून जेवण करण्यास मनाई असेल.
- सार्वजनिक स्वच्छता गृहांचे वारंवार निर्जंतुकीकरण करण्यात यावे.

इ) जर एखादा कामगार कोविड पॉझिटीव्ह आल्यास त्याला वैद्यकीय रजा देण्यात यावी व त्याला कामावर गैरहजर कारणास्तव कामावरुन कमी करता येणार नाही. सदर कामगार यांस पूर्ण पगारी वेतन देण्यात यावे.

फ) सदर आदेशात नमूद न करण्यात आलेले सर्व उद्योग/कारखाने यांनी आपला उद्योग सदर आदेश लागु असेपर्यंत बंद ठेवावेत. काही शंका असल्यास उद्योग विभाग आणि प्रशासन या बद्दल अंतिम निर्णय घेईल.

**इ) रस्त्यालगतचे खाद्य पदार्थ विक्रेत :-**

- रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी नागरीकांना त्याच ठिकाणी खाद्यपदार्थ खाण्यास देऊ नये फक्त पार्सल सेवा व घरपोच सेवा सकाळी 07.00 ते रात्री 08.00 या वेळेत सर्व दिवशी सुरु ठेवाव्यात.
- प्रतिक्षांधिन ग्राहकांना काऊंटर पासुन दुर ठेवुन सामाजिक अंतर राखुन उभे करावे.
- जी व्यक्ती अश्या प्रकारच्या कार्यात सहभागी असेल त्यांनी भारत सरकारच्या निकषानूसार तात्काळ लसीकरण करुन घ्यावे .
- स्थानिक प्रशासनाने सदर विक्रेत्यांवर प्रत्यक्ष किंवा सीसीटीव्हीव्दारे लक्ष ठेवण्याकरिता कर्मचारी यांची नियुक्ती करावी. जे ग्राहक कोव्हीड-19 प्रतिबंधात्मक उपाययोजना विषयक नियमांचे उल्लंघन करतील त्या ग्राहकांस आणि विक्रेत्यास प्रत्येकी रुपये 500 / - इतका दंड आकारण्यात येतील.
- जर सदर नियमांचे उल्लंघन केले तर सदर दुकाने साथ रोग संपेपर्यंत बंद ठेवण्यात येईल.
- जर विक्रेते पुन्हा पुन्हा नियमांचे उल्लंघन करत आहे अशी स्थानिक प्रशासनाची खात्री झाल्यास व सदर विक्रेते दंड करुनही नियमांचे उल्लंघन करीत असतील तर सदर दुकाने साथरोग आटोक्यात येईपर्यंत बंद करण्याची कार्यवाही यावी.

**फ) वर्तमानपत्रे/मासीक/नियतकालीके :-**

- वर्तमान/ मासीक/नियतकालीके यांची छपाई व वितरणास परवागनी असेल.
- वर्तमान/ मासीक/नियतकालीके यांची फक्त घरपोच वितरण सेवा सुरु राहील.
- याअनुषंगाने सुचित करण्यात येते की, वर्तमानपत्रे छपाई व वितरण यामध्ये काम करणा-या कर्मचा-यांचे भारत सरकारच्या निकषानूसार लवकरात लवकर लसीकरण करण्यात यावे.

6) **करमणुक/ मनोरंजन/दुकाने/मॉल्स/शॉपींग सेंटर इत्यादी :-**

अ) चित्रपटगृहे बंद राहतील.

ब) नाटयगृहे व प्रेक्षागृहे बंद राहतील.

क) अम्युझमेंट पार्क/आर्केडस/व्हिडीओ गेम पार्लर बंद राहतील.

ड) वॉटर पार्क बंद राहतील.

इ) क्लब, जलतरण तलाव, व्यायामशाळा व क्रीडा संकुले बंद राहतील.

फ) उपरोक्त नमुद आस्थापनांशी निगडीत व्यक्तींनी भारत सरकारच्या निकषानूसार आपले लसीकरण करुन घ्यावे. जेणेकरुन कोव्हीड-19 चा प्रसार होण्याची भिती न बाळगता राज्य शासनाकडून सदर कार्यालये सुरु करण्याबाबत त्वरीत निर्णय घेता येईल.

ग) सिनेमा/धारावाहीक/जाहीरात चित्रीकरणास परवानगी नसेल.

ह) अत्यावश्यक सेवा न पुरविणारी सर्व दुकाने, मॉल्स, शॉपींग सेंटर्स बंद राहतील.

ड) सार्वजनिक स्थळे जसे की, बगीचे, उद्याने, मोकळी मैदाने इत्यादी बंद राहतील. उपरोक्त ठिकाणी जर निर्देशांचे पालन होत नसतील तर उपरोक्त ठिकाण सदर आदेश लागु असेपर्यंत सुरु/बंद ठेवण्याबाबत स्थानिक प्राधिकरण योग्य ते निर्णय घेतील.

7) **धार्मीक स्थळे :-**

अ) सर्व धार्मीक स्थळे बंद राहतील.

ब) धार्मीक विधीशी संबंधीत व्यक्ती आपली कर्तव्ये बजावू शकतील परंतु बाहेरच्या अभ्यांगतांना (भक्तांना) प्रवेश राहणार नाही.

क) याअनुषंगाने सुचित करण्यात येते की, धार्मीक स्थळांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांचे भारत सरकारच्या निकषानूसार लवकरात लवकर लसीकरण करण्यात यावे. जेणेकरुन कोव्हीड-19 चा प्रसार होण्याची भिती न बाळगता राज्य शासनाकडून सदर धार्मीक स्थळे पुनश्च उघडण्याबाबत त्वरीत निर्णय घेता येईल.

8) **सलुन/केस कर्तनालय/स्पा/ब्युटी पार्लर :-**

अ) सलुन/केस कर्तनालय/ स्पा/ब्युटी पार्लर बंद राहतील.

ब) याअनुषंगाने सुचित करण्यात येते की, सलुन/केस कर्तनालय/ स्पा/ब्युटी पार्लर येथे काम करणा-या कर्मचा-यांचे भारत सरकारच्या निकषानूसार लवकरात लवकर लसीकरण करण्यात यावे. जेणेकरुन कोव्हीड-19 चा प्रसार होण्याची भिती न बाळगता राज्य शासनाकडून सलुन/केस कर्तनालय/ स्पा/ब्युटी पार्लर पुनश्च सुरु करण्याबाबत त्वरीत निर्णय घेता येईल.

9) **शाळा व महाविद्यालय :-**

अ) शाळा व महाविद्यालय बंद राहतील.

ब) परिक्षा देणा-या इयत्ता 10 व 12 वी च्या विद्यार्थ्यांना या नियमामध्ये सवलत देण्यात येत आहे. परिक्षेच्या कामाकरीता नियुक्त कर्मचारी यांचे लसीकरण करण्यात यावे किंवा सदर कर्मचारी यांनी 48 तासांकरीता वैध असलेले RT-PCR/RAT/TruNAT/CBNAAT निगेटीव्ह चाचणी अहवाल जवळ बाळगणे बंधनकारक राहील.

क) राज्याबाहेरील मंडळ / विद्यापीठ किंवा प्राधिकरण यांच्यामार्फत चंद्रपूर जिल्हयातील विद्यार्थ्यांसाठी परिक्षा आयोजीत केल्या असल्यास त्यांना स्थानिक आपत्ती प्राधिकरणाकडून परवानगी घेऊन परीक्षा घेता येतील.

ड) परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना जाण्या-येण्याकरीता एक प्रौढ व्यक्तीसह प्रवास करता येईल तथापी वैध प्रवेशपत्र बाळगणे आवश्यक राहील.

इ) सर्व प्रकारच्या खाजगी शिकवणी वर्ग बंद राहतील.

फ) सर्व कार्यरत कर्मचारी यांचे भारत सरकारच्या निकषानूसार लवकरात लवकर लसीकरण करण्यात यावे. जेणेकरुन राज्य शासनाकडून सदर आस्थापना सुरु करण्याबाबत त्वरीत निर्णय घेता येईल.

10) **धार्मीक/सामाजिक/राजकीय व सांस्कृतिक कार्यक्रम :-**

अ) कोणत्याही धार्मीक/सामाजिक/राजकीय व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनास परवानगी राहणार नाही.

ब) लग्न समारंभ यांना जास्तीत जास्त 25 व्यक्तींच्या उपस्थितीत परवानगी असेल.

- लग्न समारंभासाठी येणा-या अभ्यांगतांसाठी सेवा देणा-या सर्व कामगारांची लसीकरण करणे बंधनकारक असेल. आणि जोपर्यंत लसीकरण पुर्ण होत नाही तोपर्यंत वैध RT-PCR/RAT/TruNAT/CBNAAT निगेटीव्ह चाचणी अहवाल जवळ बाळगणे बंधनकारक राहील.

- वैध RT-PCR/RAT/TruNAT/CBNAAT निगेटीव्ह चाचणी अहवाल जवळ बाळगलेला नाही अथवा लसीकरण केले नाही असा कर्मचारी/व्यक्ती सेवा देतांना आढळल्यास रुपये 1000/- दंड आकारला जाईल व संबंधीत आस्थापना मालकांस रुपये 10,000/- इतका दंड आकारला जाईल.
- लग्न समारंभ आयोजीत केले जात असलेल्या ठिकाणी उपरोक्त नियमांचे वारंवार उल्लंघन केले जात असल्यास संबंधीत परिसर सिल केला जाईल आणि कोव्हीड-19 ची अधिसुचना संपेपर्यंत दिलेली परवानगी रद्द केली जाईल.

क) धार्मीक ठिकाणी कोव्हीड-19 वर्तनाबाबत असलेल्या नियमांचे पालन करुन लग्न आयोजनास परवानगी असेल.

ड) अत्यंयात्रेसाठी जास्तीत जास्त 20 लोकांना परवानगी असेल. सदर अत्यंविधीसाठीचे असलेल्या ठिकाणातील कर्मचारी यांचे लवकरात लवकर लसीकरण करण्यात यावे आणि सदर कर्मचारी यांनी वैध RT-PCR/RAT/TruNAT/CBNAAT निगेटीव्ह चाचणी अहवाल जवळ बाळगणे बंधनकारक राहील. धार्मीक ठिकाणी कोव्हीड-19 वर्तनाबाबत असलेल्या नियमांचे पालन करुन अत्यंविधी करण्यास परवानगी असेल.

11) **<u>ऑक्सीजन उत्पादन :-</u>**

अ) ज्या औद्योगिक प्रक्रियेत ऑक्सीजन हा कच्चा माल म्हणुन वापरण्यात येते अश्या सर्व औद्योगिक प्रतिबंधीत करण्यात येत आहेत. सर्व औद्योगिक आस्थापनांना ऑक्सीजन कच्चा माल म्हणून वापरता येणार नाही तथापी, अपवादात्मक स्थितीत योग्य कारणांसह लेखी परवागनी मागीतल्यास परवाना प्राधिका-याकडून पुर्व परवानगी घेऊन वापर करता येईल.

ब) सर्व ऑक्सीजन उत्पादन करणा-या आस्थापनांनी त्यांच्या उत्पादनापैकी 80 टक्के ऑक्सीजन साठा हा वैद्यकीय व औषध निर्माणासाठीच आरोग्य विभागाने निर्धारीत केल्यानुसार राखीव ठेवावयाचा आहे. त्यांनी त्यांचे ग्राहकांची नावे दि. 10.04.2021 पासुन प्रसिध्द करावीत.

12) **<u>ई-कॉमर्स :-</u>**

अ) अत्यावश्यक वस्तु व सेवा ज्यांचा समावेश या आदेशातील परिच्छेद क्र. 02 मध्ये केलेला आहे त्यांचा वितरणांस ई-कॉमर्स सेवा सुरु राहतील.

ब) घरपोच सुविधा पुरविणारे कर्मचारी व त्यांचा संपर्कात येणा-या अधिकारी/कर्मचारी/कामगार यांनी भारत सरकारच्या निकषानुसार तात्काळ लसीकरण करुन घ्यावे. जर एखाद्या आस्थापना भारत सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कामाचे ठिकाणी लसीकरण करण्यास पात्र होत असतील त्यांनी लवकरात लवकर असे लसीकरण केंद्र कामाचे ठिकाणी सुरु करण्याकरिता प्रयत्न करावेत. जे कर्मचारी घरपोच सेवेत नसतील परंतु घरपोच सुविधा पुरविणा-या कर्मचारी यांचे संपर्कात येत असतील त्यांनी या आदेशातील परिच्छेद 5 मध्ये नमुद सुचनांचे पालन करावे.

क) एकापेक्षा अधिक कुटुंबे असलेल्या सदनिकेत वितरण करायचे असेल तर ते सदनिकेच्या प्रवेशद्वारापर्यंतच सीमित असणे अपेक्षित आहे आणि त्या वस्तूंची सदनिकेच्या आतील वाहतूक ही सदनिकेच्या संबंधित कर्मचा-याने करावी. वितरण कर्मचारी आणि सदनिकेतील व्यक्ती यांच्यात होणारी सर्व देवाणघेवाण ही नियम पाळून आणि कोविड च्या अनुषंगाने शिस्तबद्ध पद्धतीने होणे अपेक्षित आहे.

ड) वितरण करताना कोव्हीड-19 संबंधित कुठल्याही नियमाचा भंग झाल्यास रु.1000/- इतका दंड आकारण्यात येईल. वारंवार निष्काळजीपणा आढळल्यास संबंधित संस्थेचा परवाना, हा कोविड-19 संबंधीची अधिसूचना असेपर्यंत रद्द केला जाऊ शकतो.

13 ) **सहकारी गृह निर्माण संस्था :-**

अ) कोणत्याही सहकारी गृहनिर्माण संस्थेत एकावेळी 05 कोरोना सकारात्मक अहवाल आलेल्या व्यक्ती आढळल्यास सदर सहकारी गृहनिर्माण संस्था सुक्ष्म प्रतिबंधात्मक क्षेत्र म्हणून घोषीत केल्या जाईल.

ब) अश्या गृह निर्माण संस्थांनी त्यांच्या संस्थेच्या प्रवेशव्दारावर अभ्यांगतांना प्रवेश बंदी असल्याबाबतचा फलक लावणे बंधनकारक असेल.

क) सोसायटी मध्ये तयार करण्यात आलेल्या सुक्ष्म प्रतिबंधात्मक क्षेत्रांमध्ये कोणत्याही नागरीकांचा प्रवेश व बाहेर जाणे याबाबत सोसायटी मार्फत मॉनिटर करावयाचे आहे.

ड) जर एखाद्या गृहनिर्माण संस्थेने उक्त नमुद निर्देशांचा भंग केल्यास पहिल्या वेळेत रक्कम रु. 10,000 /- दंड करण्यात येईल व दुस-या वेळेस त्यापेक्षा जास्त तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे आकारण्यात येईल. सदर आकारण्यात आलेल्या दंडाचा रक्कमेचा वापर हा सोसायटीमध्ये मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यांसाठी नेमण्यात आलेल्या कामागरांच्या पगारासाठी करण्यात येईल.

इ) सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या संस्थेत वेळोवेळी येणा-या व्यक्तींची ते जोपर्यंत लस घेत नाहीत तोपर्यंत RT-PCR चाचणी शासकीय नियमानूसार करावी.

14) **बांधकाम व्यवसाय :-**

अ) ज्या बांधकाम क्षेत्रात बांधकामाशी संबंधीत कर्मचारी/मजुर यांना बांधकामाचे ठिकाणी राहण्याची सोय आहे अश्या बांधकाम व्यवसायास परवानगी असेल. अश्या ठिकाणी साधन सामुग्री वाहतुकीव्यतिरिक्त कामगार व इतर वाहतुकीस परवागनी असणार नाही.

ब) ज्या व्यक्ती अश्या प्रकारच्या कार्यात सहभागी असतील त्यांनी भारत सरकारच्या निकषानुसार लसीकरण तात्काळ करुन घ्यावेत. सदर बांधकाम व्यावसायकांनी भारत सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनूसार कामाचे ठिकाणी लसीकरणाकरीता तयारीत राहावे.

क) नियमांचे भंग करणा-या बांधकाम व्यावसायीकांस रक्कम रुपये 10,000/- इतका दंड आकारण्यात येईल तसेच पुन्हा पुन्हा नियमांचे उल्लंघन झाल्यास सदर बांधकामाचे ठिकाण हे कोव्हीड-19 हा साथरोग असल्याबाबतची अधिसुचना अंमलात असेपर्यंत बंद करण्यात येईल.

ड) एखाद्या कामगार हा कोव्हीड-19 पॉझीटीव्ह आढळल्यास त्याला वैद्यकीय रजा मंजुर करण्यात यावी. त्याला कामावर गैरहजर कारणास्तव कामावरुन कमी करता येणार नाही. सदर कामगार यांस पुर्ण पगारी वेतन देण्यात यावे.

इ) पावसाळा हंगामाच्या दृष्टीने सार्वजनिक सुरक्षा किंवा संरचनेच्या कारणास्तव करण्यात येणा-या बांधकाम उपक्रमास परवानगी असेल.

15) **दंडनीय कारवाई :-**

➢ जमा होणा-या दंडाची रक्कम संबंधीत आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे देण्यात येईल. सदर दंडाचा रक्कमेचा वापर कोव्हीड-19 प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी वापरण्यात येईल.

सदर आदेशाची कोणतेही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांनी अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता कलम 188 तसेच साथरोग कायदा 1897 अन्वये दंडनीय/कायदेशीर कार्यवाही संबंधीत पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांनी करावी.

**सदर आदेशाची अंमलबजावणी संपुर्ण चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दिनांक 14.04.2021 चे रात्री 08.00 वाजेपासुन ते दिनांक 01.05..2021 चे सकाळी 07.00 वाजेपर्यंत लागु राहतील.**

**सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी दि. 14.04.2021 रोजी निर्गमीत करण्यात येत**

जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय चंद्रपूर

(अजय गुल्हाने) 14/4/21

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**<u>प्रतिलीपी</u> :- <u>माहितीस सविनय सादर.</u>**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मदत व पुनर्वसन, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई – 032
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**<u>माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.</u>**

4. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
6. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
8. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चंद्रपूर
9. स्टेशन मास्टर, दक्षिण रेल्वे, चंद्रपूर/बल्लारपुर
10. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
11. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
12. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
13. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)
14. सर्व शासकीय विभाग प्रमुख/बँक व्यवस्थापक

**<u>सदर आदेशास उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.</u>**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**